RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ६०] सोमवार, जुलै २७, २०२६/श्रावण ५, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ९०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,**
**भिवंडी विभाग, भिवंडी यांजकडून**

**नोटीस**

क्रमांक बीडी/भूसं/मुमरी धरण/टेल चॅनेल/कावि-८५०२/२०२६.— ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर, शहापूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.भाधव्यवि/भुसं/मुमरी धरण/१९०८/सन २०२६, दिनांक ०६/०७/२०२६ अन्वये मुमरी धरण निर्धारित कालावधीत (जून, २०२८ अखेर) पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर धरणातून मुंबई व ठाणे महानगर पालिकेसाठी पिण्यासाठी पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी धरणासाठी आवश्यक असलेल्या ऊर्वरित जमिनीचे भूसंपादन लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे. आवश्यक असलेल्या ऊर्वरित जमिनी या धरण बैठक क्षेत्रातील असल्यामुळे धरण काम पूर्ण करण्यासाठी त्यांचे तातडीने भूसंपादन होणे आवश्यक आहे. तसेच येणाऱ्या कामाच्या हंगामात धरणाचे काम सुरळीतपणे सुरू होण्यासाठी वरील जागेची भूसंपादन प्रक्रिया त्या अगोदर पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यामुळे या जमिनीचे भूसंपादन, भूसंपादन अधिनियम, २०१३ अन्वये न करता त्यांची भूसंपादन प्रक्रिया थेट खरेदी करण्याकामी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे ;

आणि त्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र.उजि/भूसं(समन्वय)/अे-१/ मौजे खैरे/कावि-८४/२०२४/जा.क्र. २८८, दिनांक ०६/०३/२०२४ नुसार उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय क्र. संकिर्ण ०३/२०१५, प्र. क्र. ३४अ/ अ-२, दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ तसेच महसूल व वन विभागातील परिपत्रक क्र. एलक्युएन/०१/२०१७, प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त जाहीर नोटीसांद्वारे संबंधित जमीनधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे मुमरी धरणाचे बैठक क्षेत्राचे कामासाठी लागणारी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने खरेदी घेणेकामी कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरीत्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची उपअधिक्षक, भुमि अभिलेख, शहापूर यांचेकडील प्राप्त संयुक्त मोजणी यादीनुसार अनुसूची-१ मध्ये खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांचे नावे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे व हरकती मागविण्यात येत आहेत.

त्याअर्थी, आता,

**१.** उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी, अमित सानप, उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी याद्वारे,—

(एक) अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने मुमरी धरणाचे बैठक क्षेत्राचे कामाकरिता लागणारी जमीन कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांचे नावे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन, पुनर्वसन व पुनस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क व अधिनियम कायदा, २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या २५% रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यांत येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलीत धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णतः अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबत संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

**२.** संबंधित भुधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांचेकडे सादर करावीत.

**३.** संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देणेत येईल.

**४.** सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यांत आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी व कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भुधारकांना / हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यांत आली आहे.

**अनुसूची क्र. — १**

**खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशील**

मौजे सारंगपुरी, ता. शहापूर, जि. ठाणे

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | जमिनीचा प्रकार | संपादित क्षेत्र (हे.आर) | | | खातेदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | हेक्टर | आर | प्रती | | |
| १ | २ | ३ | ४ | | | ५ | ६ |
| १ | १९६/२ | खरीप / जिरायत | २ | ०४ | ०० | कमळ गुरुनाथ हिंदोळा<br>लक्ष्मण भाऊ मेंगाळ<br>रामचंद्र शिडू भगत<br>महादु कृष्णा भगत<br>प्रकाश शिडू भगत<br>पुष्पा पंढरी हिंदोळा<br>द्वारकाबाई बाळु धापटे<br>दिपा राहुल पानेडा<br>सुनिल शिडू भगत<br>जयवंत भाऊ मेंगाळ<br>तुळशी शिडु भगत | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २८१/उ.नं./३ | खरीप / जिरायत | १ | ७२ | ०० | महादु कृष्णा भगत<br>तुळशी शिडू भगत<br>प्रकाश शिडू भगत<br>रामचंद्र शिडू भगत<br>सुनिल शिडू भगत<br>दिपा राहुल पानेडा<br>लक्ष्मण भाऊ मेंगाळ<br>जयवंत भाऊ मेंगाळ<br>पुष्पा पंढरी हिंदोळा<br>कमळ गुरुनाथ हिंदोळा<br>द्वारकाबाई बाळु धापटे | |
| ३ | २८१/उ.नं./६ | खरीप / जिरायत | ० | २३ | ०० | महादु कृष्णा भगत<br>तुळशी शिडू भगत<br>प्रकाश शिडू भगत<br>रामचंद्र शिडू भगत<br>सुनिल शिडू भगत<br>दिपा राहुल पानेडा<br>लक्ष्मण भाऊ मेंगाळ<br>जयवंत भाऊ मेंगाळ<br>पुष्पा पंढरी हिंदोळा<br>कमळ गुरुनाथ हिंदोळा<br>द्वारकाबाई बाळु धापटे | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २७१/उ.नं./१ | खरीप / जिरायत | ० | ८४ | ५० | उषा लक्ष्मण चवर<br>मारुती अंतु मुकणे<br>अशोक अंतु मुकणे<br>पिंटु अंतु मुकणे<br>विमल मल्हारी वाघ<br>गुलाब संतोष वाघ<br>फसाबाई रमण हिलम<br>ज्योती प्रकाश मुकणे<br>ताराबाई सुरेश मुकणे<br>प्रकाश सुरेश मुकणे<br>सुनिल सुरेश मुकणे<br>कैलास सुरेश मुकणे | |
| **एकूण** | | | ४ | ८३ | ५० | | |

भिवंडी,
दिनांक २४ जुलै, २०२६.

**अमित सानप,**
उपविभागीय अधिकारी,
भिवंडी विभाग, भिवंडी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.